दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १७४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१८ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पेट्रोल, डिझेल जीएसटीच्या कक्षेत आणण्याचा निर्णय फेटाळला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पेट्रोल, डिझेलचा समावेश वस्तू आणि सेवा करात करण्याचा प्रस्ताव राज्यांनी फेटाळून लावल्यानं याबद्दल कोणताही निर्णय झालेला नसल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं.

अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील जीएसटी परिषदेकडे देशाचं लक्ष लागलं होतं. पेट्रोल, डिझेललाजीएसटीच्या कक्षेत आणण्याचा निर्णय या बैठकीत होईल अशी अपेक्षा होती. मात्र अनेक राज्यांनी विरोध केल्यानं निर्णय घेतला नसल्याचं सीतारामन यांनी बैठकीनंतरच्या पत्रकार परिषदेत सांगितलं.

पेट्रोलियम उत्पादनांना जीएसटीच्या कक्षेत आणण्याची ही योग्य वेळ नाही, असं म्हणत परिषदेतल्या सदस्यांनी विरोध दर्शवल्याचं अर्थमंत्री म्हणाल्या. 'परिषदेच्या बैठकीत इंधनांना जीएसटीच्या कक्षेत आणण्याबद्दल चर्चा झाली. मात्र बऱ्याच राज्यांचा सूर नकारात्मक होता. त्यामुळे पेट्रोल, डिझेल जीएसटीच्या अंतर्गत आणण्याचा निर्णय घेण्यात आला नाही,' असं सीतारामन यांनी सांगितलं.

# रायगडकरांची स्वप्नपूर्ती ; शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मिळाली मंजुरी

## भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मंजूरी ; पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**अखेर तो दिवस आलारायगडकरांची स्वप्नपूर्ती झाली अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला केंद्र शासनाच्या अखत्यारितील भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मंजूरी मिळाली असून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या शंभर विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीची प्रवेश प्रक्रिया यावर्षी सुरु होणार असल्याची माहिती आज पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी आरसीएफ शाळा, लेक्चर हॉल, कुरुळ, अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.**



लवकरच या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी प्रवेश प्रकिया सुरू होणार असून, रायगडसह कोकणातील विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी यावेळी केले. रायगड जिल्ह्यात आरोग्य सुविधेच्या मूलभूत हक्कांपासून कोणीही वंचित राहणार नाही आणि त्यातून आरोग्य स्वयंपूर्ण रायगड वेगाने मार्गक्रमण करताना दिसून येणार आहे.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या की, जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी अलिबाग येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ५०० रुग्ण खाटांचे रुग्णालय सुरु करण्यासाठी आवश्यक बांधकाम, यंत्रसामुग्री व पद निर्मितीस शासनाने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने अलिबाग तालुक्यातील मौजे ऊसर येथे एकूण ५२ एकर जमीन संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालयाकरिता अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग यांना प्रदान करण्यात आली आहे.

या नियोजित नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी यापूर्वी शासनाने मंत्रीमंडळ बैठकीत देण्यात आलेल्या मान्यतेनुसार आवश्यक पदनिर्मिती करण्यास उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेची अटही शिथील करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आतापर्यंत अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्याच्याशी संलग्नित ५०० रुग्णखाटांच्या रुग्णालयाकरिता पुढील चार वर्षात एकूण १ हजार ७२ पदांची निर्मिती करण्यास तसेच त्याकरिता येणाऱ्या रु.६१.६८ कोटी इतक्या अंदाजित खर्चास वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने मंजूरी दिली आहे. त्यानुसार वर्षनिहाय व पदनामनिहाय पदनिर्मिती आवश्यक असल्यामुळे या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील ५०० खाटांच्या रुग्णालयाकरिता नियमित ४९६ पदे त्याचप्रमाणे गट–क ची ९९ काल्पनिक पदे आणि गट–ड ची ४७७ कंत्राटी पदे बाह्ययंत्रणेद्वारे, अशी एकूण १ हजार ७२ पदे ४ टप्प्यात निर्माण करण्यास शास–नाने मान्यता दिली आहे. हे वैद्यकीय महाविद्यालय तातडीने कार्यान्वित होण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ ४४ अध्यापकांची प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्याविषयीचे आदेशही जारी करण्यात आले आहेत असे सांगून त्या पुढे म्हणाल्या, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग सुरु करण्याकरिता भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाची जागा अपुरी असल्यामुळे राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड, थळ,अलिबाग या संस्थेच्या मौजे कुरुळ येथील वसाहतीतील जुनी शाळा, टाईप ए रेसिडन्सी क्वॉर्टरच्या सहा इमारती तसेच शाळेजवळची सहा एकर मोकळी जागा प्रति विद्यार्थी रु.२ हजार प्रति सेमिस्टर (शासकीय वसतिगृह शुल्क) अशा भाडेतत्त्वावर ३ वर्षाकरिताचा सामंजस्य करारही झाला आहे.

शेवटी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित करण्यासाठी सर्व स्तरावर मोलाचे सहकार्य करणारे राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे आणि खासदार सुनिल तटकरे या सर्वांचे आभार मानले. या पत्रकार परिषदेस रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलिस अधीक्षक अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुह–ास माने, कार्यकारी अभियंता श्री.जगदिश सुखदेवे, तहसिलदार सचिन शेजाळ, पोलीस निरीक्षक शैलेश सणस, आरसीएफचे शांताराम देशमुख, भालचंद्र देशपांडे, प्रमोद देशमुख यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

> अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी तब्बल ४०६ कोटी ९६ लाख ६८ हजार ३३६ रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आवश्यक यंत्रसामुग्री, वैद्यकीय उपकरणे खरेदीकरिता २ कोटी ९८ लाख ५३ हजार ७९८ रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. या महाविद्यालयातील अभ्यासवर्ग, प्रयोगशाळा, वाचनालय, वसतिगृह, प्रशासकीय इमारत आदि कामे पूर्ण होण्यासाठी या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथे मध्यवर्ती ग्रंथालय व व्याख्यान कक्षासाठी ११ कोटी ८३ लक्ष ७५ हजार ५५५ रुपये व २४ नर्सिंग निवासस्थानांच्या विशेष दुरूस्ती व नूतनीकरणासाठी ३ कोटी ६२ लाख ५७ हजार ६२६ रुपये अशी एकूण १५.४६ कोटींची विकासकामे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी करण्यात येणार आहेत.जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आवारातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संबंधित दुरुस्ती कामाकरिता जिल्हा नियोजन मधून रु.३५ लाख तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी पुस्तके व नियतकालिके खरेदीकरिता रु.६३ लाख मंजूर करण्यात आले आहेत.
>
> **: ना.आदिती तटकरे, पालकमंत्री रायगड**

## संक्षिप्त...

### अनिल देशमुखांची प्राप्तीकर विभागाकडून बँक खाती सील

**नागपूर : वृत्तसंस्था**

सक्तवसुली संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) पाठोपाठ आता प्राप्तीकर विभागाने राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे निवासस्थान तसेच प्रतिष्ठानांवर शुक्रवारी छापे टाकले. विभागाद्वारे करण्यात आलेल्या कारवाईमध्ये नागपूर आणि काटोल येथील सहा जागांचा समावेश असून बँक खाती सील करण्यात आल्याची माहिती आहे.

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले होते. त्या पत्रा नुसार निलंबित सहायक पोलिस निरीक्षक सचिन वाझे हे क्राईम इंटिलिजन्सच्या युनिट हेडपदी असताना महिन्याकाठी शंभर कोटी रुपये जमा करण्यास देशमुख यांनी सांगितले. परमबीर सिंग यांच्या त्या पत्रानंतर देशमुख यांच्यामागील धाडींचा ससेमिरा थांबलेला नाही. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी प्राप्तीकर विभागाच्या दिल्ली, मुंबई आणि नागपूर येथील चमूने संयुक्तरित्या कारवाई केली. यामध्ये काटोल येथील निवासस्थान, एनआयटी कॉलेज, व्हीआयपी मार्गावरील निवासस्थान, रामदासपेठेतील मिडास हाइटमधील कार्यालय, वर्धा मार्गावरील हॉटेल ट्रॅव्होटेल, शिव–ाजीनगरातील रचना गॅलेक्सीमधील फ्लॅट येथे छापे मारण्यात आले. रात्री उशिरापर्यंत ही कारवाई सुरू होती. शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता प्राप्तीकर विभागाच्या कारवाईला सुरुवात झाली. त्याप्रसंगी व्हीआपयी मार्गावरील निवसस्थानी अनिल देशमुख यांच्या पत्नी आरती आणि चिरंजीव ऋषिकेश यांच्या पत्नी राहत या उपस्थित होत्या. प्राप्तीकर विभागाच्या आठ ते दहा अधिकाऱ्यांनी निवासस्थानातील सर्व खोल्यांची तपासणी केली. लॅपटॉपमधील माहिती घेण्यात आली. घरातील एकूण एक कपाट, ड्रॉवरमधील कागदपत्रांची पाहणी करण्यात आली.

## उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांची सिडको भवनला भेट

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी १६ सप्टेंबर २०२१ रोजी सिडको महामंडळाचे मुख्यालय असलेल्या, नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील सिडको भवनला भेट देऊन नवी मुंबईतील विविध नागरी प्रश्नांवर सकारात्मक चर्चा केली.

या प्रसंगी उपमुख्यमंत्र्यांसह ना.जितेंद्र आव्हाड, गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र राज्य, ना.सुनिल तटकरे, लोकसभा सदस्य, शशिकांत शिंदे, विधानसभा सदस्य, डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, विलास पाटील, विभागीय आयुक्त, कोकण, बिपिनकुमार सिंग, पो–लीस आयुक्त, नवी मुंबई, अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, एस. एस. पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महानगरपालिका, राजेश नार्वेकर, जिल्हाधिकारी, ठाणे, डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, रायगड, शशिकांत महावरकर, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, लोकप्रतिनिधी आणि सिडकोचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

> मी सिडकोच्या संदर्भातील सर्व मुद्दे व बाबी त्याचप्रमाणे नवी मुंबईतील कायदा व सुव्यवस्थे संदर्भात विस्तृत माहिती घेतली. याचबरोबर संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.
>
> **ना.अजित पवार,**
> **उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

## २७ सप्टेंबर २०२१ रोजी भारत बंद

### बंद मध्ये सहभागी होण्याचे शेकापतर्फे आवाहन

**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्र सरकारने संमत केलेल्या तीन शेतकरी विरोधी कृषी कायद्याच्या विरोधात मागील ९ महिन्यापासून राजधानी नवी दिल्लीच्या सीमेवर शेतकरी आंदोलन करीत आहेत. शेतकरी विरोधी तिन्ही कृषी कायदे मागे घ्या,रद्द करा अशी शेतकऱ्यांची प्रमुख मागणी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप प्रणित सरकारने शेतकऱ्यांचे आंदोलन एकीकडे अनुल्लेखाने दुर्लक्ष करून संपवण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यानंतर ते प्रचंड पोलीसी दहशत व दडपशाहीने चिरडण्याचा प्रयत्न केला परंतु अद्यापही शेतकरी आपला भूमिकेवर ठाम असून आंदोलन दिवसेंदिवस तीव्र होत आहे.उत्तर भारतात शेतकऱ्यांनी भरवलेल्या महा पंचायतीला लाखो शेतकरी एकत्र जमा होत आहेत. या आंदोलनकारी शेतकऱ्यांच्या संयुक्त किसान मोर्चाने येत्या २७ सप्टेंबर २०२१ रोजी भारत बंदची हाक दिली आहे.

देशातील प्रमुख कामगार संघटनांनी 'भारत बंद' .../२

## केंद्र सरकारचा निषेध करत काँग्रेसने पाळला राष्ट्रीय बेरोजगार दिवस



**दै.रायगड नगरी । उरण**

आज १७ सप्टेंबर रोजी लाखो युवकांना बेरोजगार करणाऱ्या केंद्र सरकारला जाब विचारण्याचा दिवस म्हणून काँग्रेस पक्षातर्फे 'राष्ट्रीय बेरोजगार दिवस' म्हणून सर्वत्र पाळला जात आहे. या निमित्ताने आज दि १७ सप्टेंबर रोजी उरण तालुक्यातील सर्व तरुण व महिला कामगारांनी केंद्र शासनाच्या कामगार विरोधी, शेतकरी विरोधी कायद्याचा निषेध करत विविध घोषणा देत राष्ट्रीय बेरोजगार दिवस साजरा केला. यापुढे कोणाचाही रोजगार जाऊ नये आणि कोणाचाही संसार रस्त्यावर येऊ नये यासाठी निषेध नोंदवत कामगार वर्गांनी रस्त्यावर येऊन निषेध नोंदविला.

हा निषेध मोर्चा कामगार नेते, इंटक चे राष्ट्रीय सचिव महेंद्रशेठ घरत यांच्या मार्गदर्शनाखाली हिंद टर्मिनल्स कंपनी, भेंडखळ येथे काढण्यात आला. ह्या मोर्चासाठी उपस्थित उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश युवक इंटक– लंकेश हिरामन ठाकुर,सरचिटणीस उरण तालुका इंटक– प्रांजल दशरथ भोईर, सचिव उरण तालुक़ा युवक इंटक– रविंद्र क पाटील, उपाध्यक्ष उरण तालुका युवक– अनिल ठाकुर , सरचिटनिस रायगड जिल्हा युवक इंटक–अजित ठाकुर, उपाध्यक्ष मनसे उरण तालूका–राकेश भोईर यांच्यासह इतर कामगार उपस्थित होते.आज तरुणांना नोकऱ्या नाहीत, रोजगार उपलब्ध नाहीत. केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणामुळे बेरोजगारांच्या संख्येत वाढ होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रोजगार बाबत दिलेला शब्द पाळला नाही. रोजगार देणे दूरच उलट नरेंद्र मोदी सत्तेत आल्यापासून तरुणांच्या अनेक नोकऱ्या गेल्या आहेत. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आहे. त्यांनी घेतलेल्या कामगार विरोधी, रोजगार विरोधी धोरणाचा निषेध करत सदर राष्ट्रीय बेरोजगार दिवस पाळण्यात आल्याचे इटंकचे महाराष्ट्र प्रदेश युवक उपाध्यक्ष लंकेश ठाकूर यांनी सांगितले.

## लाईफ लाईन हॉस्पिटलचे डॉ.प्रकाश पाटील यांना आले गौरविण्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**




पनवेलमधील सुप्रसिद्ध असे लाईफ लाईन हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ.प्रकाश पाटील यांना त्यांनी आत्तापर्यंत टेस्ट ट्युब बेबी संदर्भात केलेल्या कार्याचा गौरव महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते त्यांना विशेष प्रशिस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले आहे. यावेळी झी २४ तासचे निलेश खरे सुद्धा उपस्थित होते.

पनवेलसह रायगड, नवी मुंबई व कोकणातील प्रथम टेस्ट ट्युब बेबीला जन्म देणारे व आत्तापर्यंत १० हजारापेक्षा जास्त जोडप्यांना अपत्य प्राप्ती करून देणारे डॉ.प्रकाश पाटील यांना झी २४ तास हेल्थ अॅण्ड वेल्थ या नावाने विशेष प्रशिस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देवून महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यांना सदर अॅवॉर्ड मिळाल्यामुळे पनवेलचे नाव उंच स्तरावर गेले आहे. आतापर्यंत त्यांना विविध सामाजिक संघटना, संस्थेच्या माध्यमातून गौरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे विविध वृत्तवाहिन्यांमध्ये त्यांच्या मुलाखती सादर करण्यात आल्या आहेत. या त्यांच्या यशाबद्दल त्यांच्या मित्र परिवार, डॉक्टर्स असोसिएशन, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व कुटुंबियांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

## शेतकऱ्यांसाठी भात खरेदी विक्री केंद्र आणि कृषि बाजारपेठ उभी करणार : खा.सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन विभागाचे सभापती बबन मनवे यांनी खासदार सुनिल तटकरे यांचे मार्गदर्शनाखाली म्हसळा तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना वेगवेगळ्या प्रकारची शेती करून त्यांचे कृषी धनात प्रगल्भता आणण्यासाठी आणि व्यावसायिक शेती करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी शेती विषयावर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन केले होते. न्यु इंग्लिश स्कूल म्हसळाचे सभागृहात संपन्न भव्य मेळाव्याचे उदघाटन खासदार सुनिल तटकरे यांनी मेळाव्यात तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता.

या वेळी खासदार सुनिल तटकरे यांनी मार्गदर्शन करताना शेती आणि शेती पुरक व्यवसाय शेतकऱ्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. कोकणात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो आणि त्याचा फायदा शेतकर्यांनी करून घेतला पाहिजे त्यासाठी लागणारी मदत शासनाच्या वतीने करण्यात येते त्याचा लाभ घ्यावा याचसाठी आजच्या कृषि मेळाव्याचा हट्टाहास असल्याचे खासदार यांनी सांगत शासनाच्या विविध कृषि योजनांची माहिती आणि करावयाची अंमलबजावणी बाबत अभ्यासपूर्वक माहिती दिली. होणारा खरीप हंगाम संपताच म्हसळा श्रीवर्धन मध्ये भात खरेदी विक्री केंद्र कार्यान्वित करण्यात येईल तसेच विविध प्रकारच्या कृषि मालाची बाजारपेठ उपलब्ध करून दिली .../२

# अखेर एक पाऊल पुढे

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येनंतर तब्बल आठ वर्षांनी विशेष सत्र न्यायालयात संशयित आरोपींवर आरोप ठेवण्यात यश आले आहे. पुण्याच्या मध्यवस्तीत २० ऑगस्ट २०१३ रोजी डॉ. दाभोलकर यांची सकाळी गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. डॉ. दाभोलकर यांच्या हत्येने जे हत्यासत्र सुरू झाले, त्यात पुढे एम. एम. कलबुर्गी, गोविंदराव पानसरे आणि गौरी लंकेश अशा आणखी तिघांचा बळी गेला आहे. डॉ. दाभोलकर यांच्या हत्येनंतर इतक्या काळाने आरोप ठेवण्यात आले आहेत. यावरून या चारही विवेकवाद्यांच्या हत्यांचा तपास पुरा होऊन आणि सर्व न्यायालयीन प्रक्रिया पुरी व्हायला किती कालावधी लागू शकेल, याचा अंदाज यावा. आजवरची महाराष्ट्र आणि कर्नाटकातील राज्य सरकारे; तसेच केंद्रातील सरकारे या दिरंगाईला जबाबदार आहेत. यातल्या बहुतेक प्रकरणांमध्ये तपास नीट मार्गी लागावा, यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घ्यावी लागली आहे. या चार हत्या आणि नालासोपारा येथे सापडलेला शस्त्रसाठा या साऱ्या प्रकरणांचा खरे तर एकत्रित आणि कसून तपास होण्याची गरज होती. खुद्द सर्वोच्च न्यायालयाने तशी आवश्यकता व्यक्त केली होती; मात्र आपल्या बहिणीच्या हत्येचा तपास या इतर तीन हत्यांशी जोडू नये, अशी याचिका आता पत्रकार-संपादक गौरी लंकेश यांच्या बहिणीने सर्वोच्च न्यायालयात केली आहे. प्रत्यक्षात गौरी लंकेश यांच्या हत्येचा तपास करताना काही दुवे मिळाल्यामुळे डॉ. दाभोलकर; तसेच पानसरे यांच्या हत्यांचा तपास पुढे सरकला होता, तरीही इतका विलंब झाला आहे. पुण्यातील न्यायालयात आरोपींनी आरोप नाकबूल करावेत, हे अपेक्षितच होते; मात्र आता सुनावणी चालू झाल्यावर सरकार पक्षाने साक्षी, पुरावे सादर करण्यात कोणतीही कसूर ठेवता कामा नये. डॉ. दाभोलकर यांची हत्या २०१३ मध्ये झाली. गौरी लंकेश यांची हत्या २०१७ मध्ये झाली. डॉ. दाभोलकर यांची हत्या झाल्यानंतर बराच काळ दिशाहीन तपास चालू होता. ज्यांचा संशय साऱ्या समाजाला होता; त्या संस्था आणि संघटनांची कसून चौकशी करण्यात पोलिसांना अपयश आले. हा तपास वेगाने व नीट झाला असता, तर कदाचित पुढील तीन हत्या टळल्या असत्या, असे म्हणावयास वाव आहे. या हत्यांमधील आरोपी किंवा संशयित सापडूच नयेत, अशी सुप्त इच्छा असणारे बरेच जण मोक्याच्या जागी किंवा सत्तास्थानी बसले आहेत की काय, असा संशय यावा, इतकी हलगर्जी डॉ. दाभोलकर आणि इतरांच्या हत्यांच्या तपासात झाली आहे. आता सुनावणीमध्ये या दिरंगाई आणि हलगर्जीची भरपाई होईल, अशी अपेक्षा आहे. डॉ. दाभोलकर आणि पानसरे यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या याचिकांवर याच वर्षी मार्च महिन्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने तीव्र शब्दांत आपली नाराजी व्यक्त केली होती. न्या. एस. एस. शिंदे आणि न्या. मनीष पितळे यांनी तेव्हा सीबीआय आणि सरकारला विचारले होते, 'सामाजिक कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्यानंतर आठ आणि सहा वर्षांनीही खटला कधी सुरू होणार, हे जाणून घेण्याचा हक्क समाजाला आहे की नाही? हे असे किती काळ चालत राहणार आहे? कर्नाटकात निदान एका हत्या प्रकरणात आरोपपत्र तरी दाखल झाले. इथे तेही नाही. हे काय चालले आहे?' न्यायमूर्तींनी व्यक्त केलेल्या भावना साऱ्या सुशील समाजाच्या होत्या; मात्र त्या समजून घेण्यात आणि त्यांना उचित प्रतिसाद देण्यात सरकारे, नोकरशाही आणि तपास यंत्रणा यांना यश आले नाही. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने प्रत्येक गुन्हा हा सामाजिक शांततेवरचा ओरखडाच असतो; मात्र एखादी वैचारिक भूमिका घेऊन डॉ. दाभोलकर यांच्यासारखा सामाजिक कार्यकर्ता जन्मभर जिवाचे रान करतो, तेव्हा त्याचे काम त्याला निर्भयपणे करता येणे, ही सरकार, पोलिस आणि समाजाची जबाबदारी होती. महाराष्ट्र त्यात नुसता कमी पडला असे नाही, तर या दोन्ही हत्यांमुळे महाराष्ट्रातील लोकहिताच्या सामाजिक चळवळींची मोठी हानी झाली. त्यांना प्रचंड हादरा बसला. या हत्यांचा तपास वेगाने मार्गी लावणे, याचा अर्थ या सामाजिक चळवळींना पाठबळ देणे किंवा निदान त्यांना थोडा तरी दिलासा देणे, हा होता. त्यात महाराष्ट्रातील सरकारे कमी पडली. डॉ. दाभोलकर व इतरांच्याही मारेकऱ्यांना गुन्हा शाबीत होऊन शिक्षा ठोठाविली जाणे आणि पुढे अमलात येणे, हे महत्त्वाचे टप्पे अजून गाठायचे आहेत. या मारेकऱ्यांच्या मेंदूवर विषप्रयोग करणाऱ्यांशी वैचारिक व इतर मार्गांनी दोन हात करणे, ही तर फार दूरची बाब आहे. तोवर महाराष्ट्राच्या कथित पुरोगामित्वाच्या लोंबत्या लक्तरांना चार टाके घातले गेले, तरी पुष्कळ झाले.



माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी आणि परिवाराच्यावतीने गेली ६१ वर्षे पनवेलमध्ये गणोशोत्सव साजरा केला जात आहे. दरवर्षी दहा दिवस असणाऱ्या या गणपती उत्सवास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी कोळी परिवाराने त्यांचे उस्त्फुर्तपणे स्वागत केले.

# कुणबी समाज हॉल चणेरा येथे रक्तदान शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । मुरुड**

रक्तदाता हा रुग्णांचा जीवनदाता असून रुग्ण व उपचार यामधील अमृतासारखा महत्वाचा संजीवन देणारा देवदूत आहे, अशा या रक्तदात्यांना एकत्र आणण्याचे काम दिपस्तंभ शिवशंभो सामाजिक संस्था, रोहा यांनी जिल्हा शासकीय रक्तकेंद्र, अलिबाग यांच्या सहकार्याने रोहा तालुक्यातील कुणबी समाज हॉल, चणेरा येथे नुकतेच रक्तदान शिबिराचे आयोजन केले. सध्या गणेशोत्सव सण सुरु असूनही परिसरातील रक्तदात्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे ४१ रक्तदात्यांनी या वेळी रक्तदान केले, सदर शिबिराचे उदघाटन रोहा पंचायत समिती उपसभापती रामचंद्र सकपाळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करून करण्यात आले. याप्रसंगी चणेरा सरपंच प्रसन्ना सिनकर, काशिनाथ भोईर, जलील धनसे, नरेश देवळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कोरोनाचे संकट सर्वत्र घोंगावत असताना संभाव्य तिसरी लाटही जोर धरण्याची दाट शक्यता आहे. परिणामी जिह्यात रुग्णांना अजून रक्ताचा तुटवडा भासत आहे हि गंभीर बाब लक्षात घेऊन आमच्या संस्थेने या रक्तदान शिबिराचे आयोजन केल्याचे दिपस्तंभ शिवशंभो सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष भोईर यांनी सांगितले. सदरचे शिबीर यशस्वी पार पाडण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष महादेव मोरे सदस्य मयूर विचारे, राजेश घोसाळकर, जनार्धन पाटील, अनिल भोईर, समीर वाडेकर, महेंद्र पाटेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत तीचे मालक श्री.संजय सदानंद फराड, रा.डोणे, पो.वांगणी, ता.अंबरनाथ, जि.रायगड यांचेशी चर्चा करून सदरची मिळकत कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पाषाणे, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १४८ (जुना २१५/३) | ३/क | ०-१७-० पो.ख. ०-०३-० एकूण क्षेत्र ०-२०-० | ०.१८ |

याप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदर मिळकतीबाबत कोणाही व्यक्तींचे गहाण, दान, लीज, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क, वहिवाटीचे हक्क, ताबा-कब्जा, भाडेपट्टा, कोणत्याही बोजा वा अन्य कोणतेही हक्क व हितसंबंध असल्यास अथवा आमचे अशिल सदर मिळकतीचे करत असलेल्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्तीने अथवा संस्थेने आपली हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी पोस्टामार्फत अथवा स्वतः हजर होवून सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. सदर नोटीस कालावधीनंतर व विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीत कोणाचाही हक्क व हितसंबंध व हरकत नाही असे समजून सदर मिळकतीचे आपल्या लाभांत खरेदीखताचा व्यवहार नोंदणीकृत करून सदरचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मागाहून येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
दि.१८/०९/२०२१

**सही/-**
**ॲड.किशोर बी. करावकर**
**रा.रुम नं.३०३, जगन निवास, प्लॉट नं.२३७, सेक्टर-आर-३, कोल्ही, पुष्पक नगर, वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## २७ सप्टेंबर २०२१ रोजी भारत बंद

च्या आंदोलनात सक्रिय सहभागाची घोषणा केली असून कामगार संघटनांनी लढून मिळवलेल्या ४४ कामगार कायदे रद्द करून लागू केलेल्या ४ कामगार विरोधी 'श्रम संहिता लेबर कोड' रद्द करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

केंद्र सरकारची धोरणे ही शेतकरी व कामगार विरोधी तर आहेतच. महागाई आणि बेरोजगारी वाढवणारे सुद्धा आहेत.या सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योग मोडीत काढून ते खासगी उद्योगसमूहांना कवडीमोल किमतीत विकण्याचा सपाटा लावला आहे. धर्माच्या नावाने समाजात दुही माजवून विखारी विद्वेष पसरवण्याचा धंदा जोमाने सुरू आहे. सर्व लोकशाही संकेत पायदळी तुडवून एकाधिकारशाही कडे वाटचाल सुरू आहे.हे सरकार सत्तारूढ राहिले तर भारतीय संविधानाचा गाभा असलेली सर्व सार्वभौमता, समाजवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये नष्ट केली जातील हे साधार भीती आहे. केंद्र सरकारच्या फॅसिस्ट वाटचालीला लगाम घालण्यासाठी २७ सप्टेंबर २०२१ रोजी भारत बंद प्रचंड प्रमाणात यशस्वी करणे सर्व देशप्रेमी नागरिकांचे प्रथम कर्तव्य आणि गांभीर्यपूर्वक जबाबदारी आहे. असे भारतीय शेतकरी कामगार पक्षाची भूमिका आहे. म्हणून भारतीय शेतकरी कामगार पक्ष देशातील सर्व देश प्रेमी जनतेला या भारत बंद मध्ये सहभागी होण्याचे आवाहन करीत असून पक्षाच्या सर्व जिल्हा, तालुका व गाव पातळीवर पक्ष संघटना तसेच संघटनातील कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य जनतेला संघटीत करून २७ सप्टेंबरला 'भारत बंद' मध्ये सक्रिय करून घेऊन आंदोलन यशस्वी करावे असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाने केले आहे.

## शेतकऱ्यांसाठी भात खरेदी विक्री केंद्र आणि कृषि बाजारपेठ उभी करणार

जाईल असे सांगण्यात आले. तालुक्यात शेकडो शेतकरी आधुनिक पध्दतीने शेती करण्यास प्रोत्साहित होणे गरजेचे आहे. कोकणातल्या शेतकऱ्यांनी काजू आंबा लागवड करण्यासाठी शासनाची १००%अनुदानित योजना स्वीकारावी त्यासाठी रोख खरेदी पासून खड्डा खोदणे, लागवड करणे, कुंपण घालणे, पाणी देणेसाठी शासनाचा अनुदान प्राप्त होत असतो त्याचा लाभ शेतकऱ्यांना द्यावा असे खासदार सुनील तटकरे यांनी कृषि अधिकाऱ्यांना सुचित केले. गेल्या २५ वर्षा पासुन कोकणात शेतकरी शेती कडे दुर्लक्ष करून नोकरी व्यवसायासाठी मुंबई शहराकडे स्थलांतरित झाला आहे ते कोठेतरी थांबले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करताना पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ परिस्थिती असताना तेथे नगदी पिके घेतली जातात. कोकणाला भाताचे कोठार संबोधले जाते पण आता परस्थिती बदलु लागली आहे. भात पिका बरोबरच शेळी पालन, दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, आंबा, काजु, नारळ, सुपारी, भाजीपाळा आदी व्यवसाय पूरक शेती केली पाहिजे.नवनवे तंत्रज्ञान वापरून, शासनाच्या योजनेचा लाभ घेत शेती व्यवसायात प्रगल्भता आणण्यासाठी आमचा प्रयत्न असल्याचे सांगितले.

# दाखले वाटप शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी व नगरसेवक बबन मुकादम यांनी पनवेलचे तहसिलदार विजय तळेकर यांच्याकडे केलेल्या मागणीनुसार सहा ठिकाणी शासकीय दाखले वाटप शिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्या अंतर्गत आज (शुक्रवार, दि. १७) सुकापूर येथील लक्ष्मी पब्लिक स्कुलमध्ये नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाले.



या शिबिराला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, सरपंच योगिता पाटील, माजी उपसरपंच बुवाशेठ भगत, युवा नेते किशोर सुरते, यतीन पाटील, ज्ञानेश्वर पाटील, महेश केणी, उदय म्हसकर, प्रमोद भिंगारकर, चंद्रकांत केणी, राजेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, दिव्येश भगत, चेतन केणी, प्राची जाधव, पूनम भगत, मेनका खुंटले, सर्कल श्री. मोहिते, तलाठी आरती रेवसकर, ग्रामविकास अधिकारी नंदकिशोर भगत, तहसील कार्यालय अधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली.

रेशनकार्ड, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, डोमासाईल, आधारकार्ड, वय व अधिवास, अशा विविध शासकीय दाखल्यांसाठी विद्यार्थी व नागरिकांना वेळ आणि पैसा वाचावा, आर्थिक भुर्दंड पडत असतो, त्यामुळे नागरिकांचा हा त्रास वाचविण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी व नगरसेवक बबन मुकादम यांनी पनवेलचे तहसिलदार विजय तळेकर यांची भेट घेऊन शासकीय दाखले वाटप शिबीर आयोजित करण्याची मागणी केली होती.

त्या मागणी नुसार पनवेल तालुका व शहरी भागात या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

आज सुकापूर येथील लक्ष्मी पब्लिक स्कुल येथे शिबीर पार पडले. त्याचप्रमाणे शुक्रवार दिनांक २४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कळंबोली मधील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे ज्ञानमंदिर स्कुल येथे, शुक्रवार दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता आजिवली हायस्कुल येथे, शुक्रवार दिनांक ०८ ऑक्टोबरला सकाळी ११ वाजता कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालयात तर मंगळवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता गव्हाण येथील छत्रपती शिवाजी हायस्कुलमध्ये हे शिबीर होणार असून या शिबिरामध्ये रेशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, डोमासाईल, वय व अधिवास दाखला, रहिवासी दाखला, जातीचा दाखला, शालेय विद्यार्थ्यांसाठी आधारकार्ड नोंदणी व दुरुस्ती आदी सुविधा नागरिकांना मिळणार आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली सविस्तरपणे नमूद केलेल्या मिळकतीपैकीचे ०-१६-०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| जमीन मालकांचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| बबीबाई नामदेव पाटील, कमलाबाई नामदेव माळी, रंजना प्रभाकर घरत, सुभाष नामदेव माळी, निर्मला अनिल पाटील, प्रमोद नामदेव माळी, प्रतिभा शरद खोत, सतीश नामदेव माळी | १२२/१अ/१/१ब/२/४अ/२ | ०-६०-९० पैकी ०-१६-०० | १२.७० |

तरी सदरहू वर नमूद मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
पनवेल
दि.१७/०९/२०२१

**सही/-**
**सुवर्णा म. वत्सराज**
**ॲडव्होकेट, पनवेल**

**पत्रव्यवहाराचा पत्ता : फ्लॅट नं.३०४, आदित्य विहार सोसायटी, जुन्या पोस्टाजवळ, महात्मा फुले रोड, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ फोन नं.९८३३६३९०४१**

मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.सचिन बाबुराव कांबळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.९४६/२०१
ने.ता.१८/१०/२०२१

श्रीमती.रुखसाना मोहम्मद नौमन सुलेमान
वय : ५१ वर्षे, रा.मु.८५२, तिसरा मजला,
चांदनी महल, दरिया गंज, मध्य दिल्ली-११०००२ अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असल्यामुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती स्व.मोहम्मद नौमान मोहम्मद सुलेमान हे दि.१९/०८/२०२० रोजी मयत असल्या कारणाने अर्जदाराचे पतीची मृत्यूची नोंद करून मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. तळोजा कारागृह खारघर, ता.पनवेल, जि.रायगड मध्ये मृत्यू झाला असल्याने अर्जदाराने या न्यायालयात स्व.मोहम्मद नौमान मोहम्मद सुलेमान यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहून स्व.मोहम्मद नौमान मोहम्मद सुलेमान ह्या वर नमूद ठिकाणी मयत झालेल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवावे. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहून न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहून व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१६/०९/२०२१ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, १) श्रीमती.तुळसाबाई बामा ठाकूर, २) श्री.विश्वास बामा ठाकूर, ३) विनायक बामा ठाकूर यांचे वारस १) श्रीमती.समता विनायक ठाकूर, २) कुमार श्लोक विनायक ठाकूर राहणार : शिवाजीनगर, पोस्ट गव्हाण, पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्यांकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल श्री.पंकज मणिलाल पटेल, २) श्री.नरेंद्र मणिभाई पटेल पत्ता : शॉप नं.बी ११०६/११०७, महावीर आयकॉन, प्लॉट नं.८९/८०, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांनी त्रिपक्षीय करारनामा/हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक १९३८ उलवे नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | १८ | १९ सी | ५९९.५९ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, म्हसळा यांचे कोर्टात
दावा क्र.०००५/२०२१
ने.ता.२९/०९/२०२१

श्रीम.पार्वती लक्ष्मण घुलघुले (मयत) वारस
१) श्री.संतोष लक्ष्मण घुलघुले
२) रंजना चंद्रकांत गिजे
३) नितेश शांताराम पाडावे
४) शैला नितेश पाडावे
५) सुनिता शांताराम पाडावे
सर्व रा.चिरगांव, ता.म्हसळा, जि.रायगड अर्जदार (कुळ)
विरुद्ध
१) शहासिद्धी महामूद खान सिद्दी महमदखान
२) फतिमा बेगम आदनजी जसदनवाला
३) मुमताज बेगम सलम खान
४) कमरुजा बेगम सिद्दी महमद खान
५) दाम्या भाग्या घुलघुला
६) जान्या महादू गोरिवला
७) पांडु अर्जून पाटील
सर्व रा.चिरगांव, ता.म्हसळा, जि.रायगड सामनेवाला (जमीन मालक)

या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचिमध्ये नमूद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. त्याकामी सामनेवाला (जमीनमालक) यांना नोटीसची बजावणी दिलेल्या पत्यावर झालेली नाही. सामनेवाला (जमीनमालक) सध्या कोठे राहतात याची माहिती नाही.

तरी वरील सामनेवाला (जमीनमालक) आणि अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या मिळकतीमध्ये ज्यांचा हितसंबंध असेल त्यांनी अगर त्यांचे हक्क सांगणारे त्यांचे वालीवारस यांना स्वतः वकील अथवा प्रतिनिधीमार्फत दि.२९/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण माणगांव, जि.रायगड येथे स्वतः वकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहून बाजू मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसूर करील तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसूचि**

| गावाचे नाव | स.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| चिरगांव | ११/३ अ १ | १-६२-०० पैकी १-२०-०० | ०.५४ |

ठिकाण : म्हसळा
दि.१६/०९/२०२१

**सही/-**
**अपर तहसीलदार व**
**शेतजमीन न्यायाधिकरण म्हसळा**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

### म्हसळा तालुक्यातील विविध तलाठी कार्यालयांकरिता जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तलाठी कार्यालय हे नागरिकांसाठी ग्रामीण स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे कार्यालय मानले जाते. या कार्यालयातून जनतेची महसूलविषयक सर्व प्रकारची महत्त्वाची कामे केली जातात. या पार्श्वभूमीवर लिपणी, वरवटणे, खरसई या तलाठी कार्यालयांच्या इमारतींच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी केली होती. याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार लिपणी येथील तलाठी कार्यालय, वावेसाठी क्षेत्र ०.०३.० हे.आर., वरवटणे येथील तलाठी सजा, वरवटणेसाठी क्षेत्र ०.०३.० हे.आर., खरसई येथील तलाठी सजा, मेंदडीसाठी क्षेत्र ०.०३.० हे.आर., ही जमीन महसूल मुक्त व सारामाफीने संबधित तलाठी कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी जारी केले आहेत.

### विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी दि.30 सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनु. जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटीच्या संकेतस्थळावर शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी दि.३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या मुदतीत अर्ज भरावेत, असे आवाहन प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग श्रीमती वंदना कोचुरे यांनी केले आहे.

कोविड-१९ विषाणूच्या संसर्गामुळे काही महाविद्यालये बंद आहेत. ऑनलाईन पध्दतीने अभ्यासक्रम शिकविला जात आहे. विद्यार्थी महाविद्यालयात उपस्थित राहात नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज सादर केलेले नाहीत. विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, म्हणून अद्यापही शिष्यवृत्तीचे अर्ज भरले नसलेल्या विद्यार्थ्यासाठी शासनाने मुदतवाढ दिली आहे. मुंबई विभागातील विविध महाविद्यालयात सन २०२१-२२ मध्ये प्रवेश घेतलेले व शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज तात्काळ https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत.

# पेणच्या वीज चोरांना महावितरणचा दणका ; आठ महिन्यांत ९६ ग्राहकां विरोधात कारवाई

**दै.रायगड नगरी । देवा पेरवी / प्रदीप मोकल**

महावितरणकडून घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व कृषी ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. वीज वापराच्या मोजमापासाठी ग्राहकांच्या घरात मीटर बसविले जाते. मीटर रीडिंगनुसार वीज बिलाची आकारणी केली जाते. वीज ग्राहकांनी वापरलेल्या विजेचे बील भरणे अपरिहार्य असताना काहीजण वीज बील वाचविण्यासाठी मीटर मध्ये फेरफार करणे, वीज पोलावरून आकडा टाकून डायरेक्ट वीज कनेक्शन घेणे, असले नको ते उद्योग करुन आपले वीजबिल कमी करण्याचा प्रयत्न करुन महावितरणची फसवणूक करत असतात. या वीज चोरीला आळा घालण्यासाठी महावितरणने देखील आता कडक धोरण अवलंबले असून या वीज चोरांची वीज पुरवठा कायमचा बंद करणे, त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येत आहेत.

वीजचोरी पकडली गेल्यास त्या ग्राहकांच्या विरोधात भारतीय विद्युत कायद्याच्या कलम १३५, १३८ व १२६ अंतर्गत फौजदारी खटला दाखल केला जाऊ शकतो.

पेण मध्ये २०२१ मधील जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत ९६ ग्राहकां विरोधात वीजचोरी विरोधात कारवाई करण्यात आली. यातील चार ग्राहकां विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत २९ लाख ७५ हजार ५१० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून तडजोडी अंती सहा लाख ८४ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

> मीटर मध्ये फेरफार करुन वीज चोरी करणे, पोलावरून वीज कनेक्शन घेऊन तसेच कोणत्याही प्रकारे वीज चोरी करणे हा कायद्याने गुन्हा आहे. अशा ग्राहकां विरोधात दंड व फौजदारी गुन्हा दाखल केला जाऊ शकतो.
>
> **: उमाकांत सपकाळे,**
> **उप अभियंता, विद्युत महावितरण, पेण**

आपण वापरलेल्या विजेचे बील कमी यावे या साठी काहीजण अनेक युक्त्या वापरतात. मीटरमधील वायरीत फेरफार करण्यासाठी चुंबक आणि नाण्याचा वापर करून वीजमीटरचा वेग नियंत्रित केला जातो. काही ठिकाणी रात्रीच्या वेळेला विद्युत पोल वरुन डायरेक्ट लाईन घेऊन वीजचोरी केली जाते. अनेक ठिकाणी रिमोट कंट्रोलच्या साह्याने मीटर रिडींग मध्ये फेरफार करुन युनिट कमी करण्याचा प्रयत्न देखील केला जातो. एखादा ग्राहक वीज चोरी करताना आढळल्यास त्याने चुकविललेल्या बिलाची रक्कम व दंड वसूल केला जातो. ही रक्कम मोठी असल्यास तडजोडीची रक्कम भरण्याचा पर्याय देखील दिला जातो. तडजोडीची रक्कम देखील भरण्यासाठी ग्राहकाने टाळाटाळ केल्यास त्याचा मीटर जप्त केला जातो. काही वेळेस त्या ग्राहकांच्या विरोधात फौजदारी कारवाई देखील करण्याची तरतूद आहे.

# क्रूरपणे हत्या करुन मृतदेहाचे तुकडे करणाऱ्या आरोपीला एपीएमसी पोलिसांनी ३६ तासात केली अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एपीएमसी मार्केटमध्ये गत रविवारी प्लास्टिक पिशवीमध्ये आढळून आलेल्या मृतदेहाचे तुकडे हे रवि उर्फ रविंद्र रमेश मंडोतीया (३०) याचे असल्याचे तसेच सुमीतकुमार हरिषकुमार चौहान (२७) या नातेवाईकानेच आर्थिक देवाणघेवाणीतून त्याची अत्यंत क्रुरपणे हत्या करुन त्याच्या मृतदेहाचे तुकडे वेगवेगळ्या ठिकाणी टाकून पुरावा नष्ट केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. एपीएमसी पोलिसांनी कोणताही पुरावा नसताना, या हत्या प्रकरणातील मृत व्यक्तीची ओळख पटवून आरोपी सुमीतकुमार चौहान याला ३६ तासात अटक केल्याची माहिती पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी दिली.

या घटनेतील मृत रवि मंडोतीया हा घणसोलीत रहाण्यास होता. तर त्याची हत्या करणारा आरोपी सुमितकुमार हा खैरणे गावात रहाण्यास होता. हे दोघेही एकमेकांचे दुरचे नातेवाईक होते. तसेच दोघेही कोपरखैरणेत वेगवेगळ्या इमारतीत साफसफाईचे काम करत होते. रवि मंडोतीया याने काही महिन्यापुर्वी सुमीतकुमार याच्याकडू उसने पैसे घेतले होते. मात्र रवि हे पैसे देण्यासाठी टाळाटाळ करत होता. त्यामुळे त्या दोघांमध्ये मागील दिड दोन महिन्यांपासून वाद सुरु होता. सुमितकुमार रविकडे आपल्या पैशांची मागणी सतत करत होता. मात्र रवि त्याला पैसे मागितल्यास मारुन टाकेन अशी धमकी देत होता. त्यामुळे हा खरच आपल्याला मारुन टाकेल अशी भिती सुमित कुमार वाटत होती. त्यामुळे त्याने रविचा कायमचा काटा काढण्याचे ठरविले होते. त्यानुसार ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी रविची पत्नी आपल्या मुलांना घेऊन गार्डनला गेली असताना, सुमितकुमार रविसोबत दारु पिण्यासाठी त्याच्या घरात बसला होता. याचवेळी त्याने संधी साधुन चॉपरच्या सहाय्याने रविचा गळा चिरुन त्याची हत्या केली.

त्यानंतर त्याने चॉपर आणि सत्तुरच्या सहाय्याने घरातून बाथरुममध्ये त्याच्या मृतदेहाचे तुकडे करुन ते फ्लॅस्टिक पिशवीमध्ये भरले. त्यानंतर हात आणि पायाचे तुकडे एपीएमसी मार्केटमधील माथाडी चौकातून पुनित कॉर्नरच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यालगत टाकून दिले. तसेच त्याचे धड शिळफाटा येथे टाकून दिले, तर त्याचे मुंडके खैरणे गावाच्या पाठीमागील भागात जमिनीत पुरुन पुरावा नष्ट केला होता.

दरम्यान, दोन दिवसानंतर रविवारी सकाळच्या सुमारास एपीएमसी मार्केटमध्ये निळ्या रंगाच्या पिशवीमध्ये दोन्ही हात पाय व दोन्ही मांडयाचे तुकडे सापडल्यानंतर एपीएमसी पोलिसांनी सदरचे तुकडे ताब्यात घेऊन डॉग स्कॉडच्या मदतीने मृत व्यक्तीचे मुंडके व धड शोधण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांना त्यात यश आले नव्हते. त्यामुळे एपीएमसी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करुन मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. त्यासाठी परिमंडळ-१चे पोलीस उपआयुक्त सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास रामुगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर टकले, वसीम शेख, गजानन कडाळे, शेवाळे, झांजुर्णे, पोलीस उपनिरीक्षक आव्हाड, पोलीस हवालदार धुमाळ व त्यांच्या पथकाने मिसींग व्यक्तींचा शोध घेण्यास सुरुवात केली होती.

> या हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी सुमीतकुमार याने आपल्या मुळगावी उत्तर प्रदेश येथे दिड वर्षे मटणाच्या दुकानात खाटीक म्हणून काम केले आहे. त्यामुळे त्याने आपला नातेवाईक रवि मंडोतिया याची देखील अत्यंत क्रुरपद्धतीने हत्या करुन त्याचे वेगवेगळे तुकडे केल्याचे तपासात आढळुन आले आहे.

या शोध मोहीमेत कोपरखैरणे पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या रवी मंडोतीया याच्या मिसींग तक्रारीतील वर्णन हे एपीएमसी मार्केटमध्ये सापडलेल्या मृत व्यक्तींशी मिळते जुळते असल्याचे आढळून आले. त्यानंतर अधिक चौकशीत एपीएमसी मार्केटमध्ये सापडलेले मृतदेहाचे तुकडे हे कोपरखैरणेतून मिसींग झालेल्या रवि मंडोतिया याचा असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर एपीएमसी पोलिसांनी बातमीदरामार्फत, सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पहाणी करुन व तांत्रिक तपासाद्वारे तपास करुन आरोपी सुमीतकुमार चौहान याला कोपरखैरणे येथून अटक केली. त्यानंतर पोलिसांनी त्याची अधिक चौकशी करुन शिळफाटा येथे टाकून दिलेले रविचे धड, तसेच खैरणे गाव येथे पुरलेले मुंडके हस्तगत केल्याचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी सांगितले.

### बिबट्याच्या वावराच्या माहितीमुळे ग्रामस्थ भयभीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्या भक्षाच्या शोधात एक बिबट्या गावाच्या परिसरात वावरत असल्याची माहिती ग्रामस्थांना मिळाल्याने त्यांच्यामध्ये भितीयुक्त वातावरण आहे.

तालुक्यातील वाकडी गावचे हद्दीतील केवाळे गाव पूल ते वाकडी पोलीस चौकी परिसरात काही ग्रामस्थांसह ॲड.अरुण पाटील यांना रात्रीच्या वेळी बिबट्या फिरताना दिसल्याने त्यांनी याबाबतची माहिती तालुका पोलीस तसेच वनविभागाचे अधिकारी सोनावणे यांना दिली.

त्यानुसार ग्रामस्थ, तालुका पोलिसांचे पथक व वनविभागाचे पथक यांनी तो परिसर पिंजून काढला असता अनेक ठिकाणी पावलांचे ठसे दिसून आले आहेत.

त्यामुळे परिसरातील ग्रामस्थांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

# ओबीसी मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी राजेश गायकर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी कामोठे येथील राजेश गायकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांची नियुक्ती जाहीर करत पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात आज (दि. १७) झालेल्या या कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, ओबीसी मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष चंद्रकांत घरत, पनवेल शहर सरचिटणीस नगरसेवक नितीन पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष रविंद्र जोशी, नगरसेवक दिलीप पाटील, विजय चिपळेकर, संतोष भोईर, युवा नेते दशरथ म्हात्रे, दिनेश खानावकर, ज्येष्ठ कार्यकर्ते प्रदीप भगत, गणेश गायकर, आप्पा भागीत, जनार्दन पाटील, प्रवीण खंडागळे आदी उपस्थित होते.

राजेश गायकर यांनी यापूर्वी रायगड जिल्हा ओबीसी मोर्चा सरचिटणीस म्हणून काम केले आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी सांभाळत विविध उपक्रमात त्यांचा सहभाग असतो तसेच जनसंपर्क दांडगा आहे. त्यांच्यावर ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

# प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनाचे अभिवादन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या १३६ व्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तहसिलदार (महसूल) विशाल दौंडकर यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत ही श्रीमती.विठाबाई आत्माराम राजे, वय : ७५ वर्षे, रा.तळोजे मजकूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांचे कसवणुकीतील, ताबेकब्जातील व मालकीतील जमीन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अनु क्र. | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ६७ | क/५ | ०-०८-१०<br>पो.ख. ०-००-१९<br>एकूण ०-०८-२९ | ०.५० |

आमच्या अशिल १) सौ.शशिकला हिराजी मुंबईकर वय : ५८ वर्षे, पत्ता : बी २०४, सत्यमेव बिल्डींग, सेक्टर ४, प्लॉट क्र.८, सेंट जोसेफ स्कूलजवळ, कळंबोली, नवी मुंबई ४१०२१८ यांनी सदरची मिळकत मोबदल्यापोटी कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकतीमध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हकूनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्या प्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अश हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्रीमती.विठाबाई आत्माराम राजे, यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.१७/०९/२०२१

**सही/-**
**श्री.सचिन पुंडलिक केणी, ॲडव्होकेट-पनवेल**
**गाळा क्र.१४, आशियाना को.ऑप.सो.,**
**प्लॉट नं.१०७ ए, ता.पनवेल, जि.रायगड**
**पिन नं.४१०२०६**
**मो.नं.९९२०९७३४६७/८८५०८३९५८८**

## जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, १) डॉ. श्री.विकास सुदर्शन मोरे, २) डॉ.सौ.संजीवनी विकास मोरे, ३) श्री.सुदर्शन ग्यानदेव मोरे, ४) सौ.कावेरी सुदर्शन मोरे, ५) सौ.वैशाली श्याम मोरे, रा.२०१, साई कृपा अपार्टमेंट, प्लॉट क्र.३, सर्व्हे क्र.७९, आनंद नगर, उरण, ता.उरण, जि.रायगड यांच्या मालकीचा मौजे : द्रोणागिरी नोड येथील सेक्टर क्र.५३, भूखंड क्र.१८९, क्षेत्र ४४९.१९ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड आहे. सदर भूखंड हा सिडको द्रोणागिरी संचिका क्र.१८९ प्रमाणे आहे.

१) डॉ.श्री.विकास सुदर्शन मोरे, २) डॉ.सौ.संजीवनी विकास मोरे, ३) श्री.सुदर्शन ग्यानदेव मोरे, ४) सौ.कावेरी सुदर्शन मोरे, ५) सौ.वैशाली श्याम मोरे यांनी सदर भूखंड हा मयुर इंफ्रार्निटी भागीदार संस्था तर्फे भागीदार १) श्री.गॅस जसिम इस्माईल २) श्री.फुरकान शफी नवरंगे ३) श्री.शेखर भास्कर पाटील ४) सौ.नितुदेवी नाथ सिंग बिष्ट राहणार : ४८२, उरण कोळीवाडा, उरण, ता.उरण, जि.रायगड यांस कायमस्वरुपी विक्री करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाबाबत सिडको कार्यालयात त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

तरी कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्टर्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जी पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे समानण्यात येईल आणि सदर भूखंड हा मयुर इंफ्रार्निटी भागीदार संस्था तर्फे भागीदार १) श्री.गॅस जसिम इस्माईल २) श्री.फुरकान शफी नवरंगे ३) श्री.शेखर भास्कर पाटील ४) सौ.नितुदेवी नाथ सिंग बिष्ट हे सिडकोसोबत त्रिपक्षीय कराराने आपल्या नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत असेल असे मानण्यात येईल.
दि.१७/०९/२०२१

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**१ मजला, श्री.प्रेरणा अर्पा.,**
**उरण, ता.उरण, जि.रायगड**
**संपर्क : ९७०२२०९११४**
Email : mariya.koli@yahoo.com

श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर
सौ.निलम विशाल मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२४१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/११/२०२१

१) सौ.सुनिता किशोर पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.शिला प्रशांत म्हात्रे
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.भारती बाळाराम वालीलकर
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.दहिसर मोरी, पो.दहिसर, ता.जि.ठाणे अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ ते ३ या एकमेकींच्या सख्या बहिणी आहेत. सदर अर्जदारांचे वडील भाऊ रामा पाटील हे दि.३०/०५/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांची पत्नी म्हणजेच अर्जदारांची आई शेवंताबाई भाऊ पाटील या देखील दि.२१/११/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. सदर अर्जदारांची आई मयत शेवंताबाई भाऊ पाटील यांच्या नावे पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे : तोंडरे, ता.पनवेल येथे घर मिळकत क्र.४५९, क्षेत्र १४७० चौ.फूट ही घर मिळकत आहे.

आता वर नमूद केलेली घर मिळकत अर्जदारांच्या नावे होण्याकरिता त्यांनी पनवेल महानगरपालिकेच्या संबंधित कार्यालयात चौकशी केली असता त्यांस मयत शेवंताबाई भाऊ पाटील यांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगण्यात आले. सबब अर्जदार या शेवंताबाई भाऊ पाटील यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१७ माहे सप्टेंबर सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे मॅडम

अर्जदाराचे वकील
ॲड.धिरज बोबडे

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.३५४/२०२१
नि.नं.१५/ड
ने.ता.१३/१०/२०२१

१) श्रीमती.सुरेखा संभाजी भोसले
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.राहूल संभाजी भोसले
वय : २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.पवन संभाजी भोसले
वय : २६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सर्व अर्जदार रा.रुम नं.७०१, सातवा मजला,
प्रतापगड को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.३७,
सेक्टर नं.३४, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार क्रमांक १) श्रीमती.सुरेखा संभाजी भोसले ह्या कै.संभाजी शिवाजी भोसले यांची कायदेशीर पत्नी आहे. तसेच अर्जदार क्रमांक २ व ३ हे त्यांचे मुलगे आहेत. तसेच कै.संभाजी शिवाजी भोसले यांच्या मालकीच्या खालील वर्णनाची मिळकती आहेत.

| अनुक्रमांक | मौजे | रुम नं. | क्षेत्र | रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ) | कामोठे, पनवेल | रुम नं.७०१, सातवा मजला, प्रतापगड को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.३७, सेक्टर नं.३४, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड | ६२०.४ चौ.फूट + ६२ चौ.फूट ओपन टेरेस | रु.४६,००,०००/- |
| ब) | तळोजा पनवेल | रुम नं.३०३, तिसरा मजला, सिल्वर पार्क को.ऑ.हौ.सो. लि., प्लॉट नं.११, जी ई एस, सेक्टर नं.०२, तळोजा पाचनंद, नवी मुंबई-४१०२०८, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड | २८.६६ चौ.मी. | रु.१५,००,०००/- |
| क) | जुईनगर नेरुळ | रुम नं.१०३, पहिला मजला, शिव दर्शन अपार्टमेंट को. ऑ.हौ.सो., प्लॉट नं.५६, गोपीनाथ ठाकूर मार्ग, सेक्टर नं.२३, जुईनगर, नेरुळ नोड, नवी मुंबई-४००७०६ | ४७५ चौ.फूट | रु.३,०६,१८०/- |

सदर कै.संभाजी शिवाजी भोसले यांच्या मृत्यूनंतर सदरहू अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांच्या नावाची कै.संभाजी शिवाजी भोसले यांचे वारस म्हणून नोंद होणे आवश्यक व गरजेचे आहे. त्याकरिता अर्जदार यांनी कै.संभाजी शिवाजी भोसले यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळविण्यासाठी मा.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस प्रदान करण्याच्या कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास त्यांनी सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.न्यायालयात हजर होवून हरकती दाखल कराव्यात. मुदत संपल्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांच्या लाभांत वारस दाखला दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दि.१७/०९/२०२१ रोजी माझे सहीने व मा.न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## खारघर, द्रोणागिरी आणि उलवे येथे काही कालावधीसाठी आठवड्यातून एक दिवस पाणी पुरवठा राहणार बंद

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाकडून खारघर, उलवे आणि द्रोणागिरी नोडमधील पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सुधारण्याकरिता हाती घेण्यात आलेल्या देखभालीच्या कामांसाठी दिनांक १९ सप्टेंबर २०२१ पासून काही कालावधीसाठी दर आठवड्यातील ठराविक दिवशी संबंधित नोडमधील पाणी पुरवठा २४ तासांसाठी बंद राहणार आहे.

याबाबतचे वेळापत्रक सिडकोतर्फे जाहीर करण्यात आले असून, या वेळापत्रकानुसार द्रोणागिरी व मजीप्रा (जेएनपीटी) येथे दर रविवारी सकाळी ०८.०० वाजेपासून ते सोमवारी सकाळी ०७.०० वाजेपर्यंत, खारघर नोडमध्ये दर सोमवारी सकाळी ०८.०० ते मंगळवारी सकाळी ०७.०० वाजेपर्यंत, उलवे नोडमध्ये दर मंगळवारी सकाळी ०८.०० वाजेपासून ते बुधवारी सकाळी ०७.०० वाजेपर्यंत पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी व आदल्या दिवशी पुरेसा पाणी साठा करून सिडकोस सहकार्य करावे, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

## प्लास्टिकच्या बरणीत हरणटोळ सापाने दिले ६ पिल्लांना जन्म

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा जिल्हा परिषद शाळेत हरणटोळ जातीचा साप शिरला होता. येथील सर्पमित्र अमर पाल व चांद शेख यांनी त्याला पकडून एका प्लास्टिकच्या बरणीत ठेवले.

त्यानंतर या सापाने तब्बल ६ पिल्लांना बरणीतच जन्म दिला. काही वेळाने वनविभाग व सर्पमित्रांच्या मदतीने हरणटोळ व तिच्या ६ पिल्लांना वनविभागाचे कर्मचारी मुकेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुखरूप जंगलात नेऊन सोडले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# समृध्दी अपार्टमेंटविरूध्द पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

## पोलादपूरमधील अपार्टमेंटसबाबत गौडबंगाल उघडकीस येणार?

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : शहरामध्ये गेल्या आठ दहा वर्षांपासून विविध अपार्टमेंटसच्या उभारणीपासून सुरू झालेल्या अनेक लोकचर्चेतून व्यक्त होणाऱ्या हालचालींनंतर अद्याप कोणीही पोलीस ठाण्याचा दरवाजा ठोठावण्यापर्यंत गेले नसल्याने झाकून राहिलेलं गौडबंगाल समृध्दी अपार्टमेंटविरूध्द पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने उघडकीस येण्याची चिन्हे दिसून येत आहेत. उमरठ येथील फिर्यादीने याप्रकरणी झालेल्या ८.४५ लाखांच्या आर्थिक व्यवहारातील फसवणुकीबाबत पोलादपूर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याने तपासाची चक्रे वेगाने फिरण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

उमरठ येथील फिर्यादी कैलास दत्ताराम पार्टे यांनी समृध्दी अपार्टमेंटमध्ये सी विंग सदनिका क्रमांक १०७ क्षेत्र ३८० चौरसफूट हे २३०० रूपये प्रतिचौरस फुट दराने खरेदी करण्याचे ठरले. त्यानंतर ४६० चौरसफूट क्षेत्र १९०० रूपये दराने खरेदी करण्याचे ठरले. सी विंग मधील सदनिका क्रमांक १०७ आणि सध्याची बी विंगमधील सदनिका क्रमांक १०७ ही खरेदी करण्यासंदर्भात व्यवहार झाला असताना ती अद्याप फिर्यादी यांच्या नावे न करता अपर्णा देहू मोरे (रा. ठाणे)यांच्या नांवे साठेखत करून फिर्यादी यांची फसवणूक करण्यात आली. याबाबत फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना दिली नव्हती अथवा त्यांची पूर्वपरवानगी घेतली नव्हती, असे तक्रारअर्जात नमूद करण्यात आले आहे. यासंदर्भातील आर्थिक व्यवहार १७ ऑगस्ट २०१४ ते २९ नोव्हेंबर २०१७ रोजी पोलादपूर पंचायत समितीच्या बाजूला पोलादपूर शहरामधील समृध्दी अपार्टमेंट येथे झाला. याबाबत समृध्दी रिअल्टर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे बिल्डर तृषाण गणपत कदम आणि प्रियांका तृषाण कदम यांच्याकडे फिर्यादी कैलास दत्ताराम पार्टे रा.उमरठ, पो.साखर. ता.पोलादपूर यांनी वारंवार सदनिका आणि दिलेल्या रकमेबाबत वारंवार चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने फिर्यादी यांनी गुरूवार, दि. १६ सप्टेंबर २०२१ रोजी सायंकाळी ४.५० वाजता पोलादपूर पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप शिरगांवकर अधिक तपास करीत आहेत.

गेल्या काही वर्षांपासून समृध्दी रिअल्टर्स ॲण्ड डेव्हलपर्सच्या समृध्दी अपार्टमेंट या इमारतीमधील सदनिकाधारकांच्या खरेदी



व्यवहारासंदर्भात तसेच एकूणच सामायिक जमीन, एफएसआय क्षेत्र, बुकींग व सदनिका खरेदी, विद्युतपुरवठा, घरनंबर व मालमत्ताआकारणी, सोसायटी स्थापनेबाबतच्या अडचणी, ताबा देण्यासंदर्भातील अडचणी, एकच सदनिका अनेकांना विक्री करणे, एजन्टसद्वारे केली गेलेली फसवणूक तसेच अन्य अनेक विषयांबाबत पोलादपूर शहर आणि तालुक्यामध्ये जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, प्रत्येकवेळी तक्रारदार आज पोलीस ठाण्यात जाईल, उद्या जाईल, अशी शक्यता असताना तक्रार केली जात नसे. कधी पोलीस ठाण्यातून तक्रारदारांना दिवाणी प्रकरण असल्याचे सांगून परस्पर कोर्टात जाण्याचा सल्ला दिला जात होता तर कधी तक्रारदारांना तडजोडीतून तक्रार करण्यापासून परावृत्त केले जात होते. मात्र, आता या सर्व बाबींवर प्रकाशझोत पडण्याची चिन्हे दिसून येत असून उमरठ येथील फिर्यादी कैलास दत्ताराम पार्टे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलादपूर पोलीस ठाण्यात ३४-२०२१ गुन्हा र.नं.नुसार भा.दं.वि. ४२०,४०६ व ३४ कलमान्वये बिल्डर्स तृषाण गणपत कदम आणि प्रियांका तृषाण कदम (आरोपींचा पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर शहरातील अनेक अपार्टमेंटच्या उभारणीतील त्रुटी व दोषांसंदर्भातील प्रकरणांची चर्चादेखील पोलादपूर शहरामध्ये होत असून भविष्यात त्या काही अपार्टमेंटसमधील सदनिकाधारकांकडून पोलीस ठाण्याचा दरवाजा ठोठावला जाण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

## प्रवीण दरेकर यांच्या आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात खोपोलीत जोडे मोरा आंदोलन



**दै.रायगड नगरी । राज साळुंके**

**खोपोली** : विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात खोपोली राष्ट्रवादी काँग्रेस महिलांतर्फे जोरदार घोषणाबाजी करण्यात आले.

तसेच आमदार दरेकर यांच्या फोटोला जोडे मारून निषेध व्यक्त करीत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. यावेळी नगराध्यक्ष सुमन औसलमल, नगरसेवक मोहन औसलमल, राष्ट्रवादी युवक अध्यक्ष अतुल पाटील, महिला शहराध्यक्ष सुवर्णा मोरे, नगरसेविका सुनिता गायकवाड, सेक्रेटरी जयश्री डोंगरे, उपाध्यक्ष अश्विनी ढोले, प्रज्ञा मालिका, उर्मिला गायकवाड, प्रियांका मोरे, भाग्यश्री गुडूर, गौरव मस्के, अमित पवार, विनोद राजपूत, भास्कर लांडगे उपस्थित होते.

## तरुणीचे मॉर्फ केलेले फोटो व्हिडीओ व्हायरल करणारा आरोपी जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली परिसरात राहणाऱ्या एका १७ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीच्या नावाने बनावट इन्स्ट्राग्राम अकाऊंट तयार करुन त्यावर मॉर्फ केलेले तरुणीचे अश्लिल फोटो, व्हिडीओ तसेच अश्लिल मेसेज टाकुन सदर तरुणीची बदनामी करणाऱ्या आरोपीला नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलने अटक केली आहे. अजय देवलाल शिंगणे (२०) असे या आरोपीचे नाव असुन त्याने सदर तरुणीची बदनामी करण्याच्या उद्देशाने सदर प्रकार केल्याचे कबुल केले आहे.

अज्ञात व्यक्तीने कळंबोलीत रहाणाऱ्या एका १७ वर्षीय तरुणीच्या मोबाईल क्रमांकाचा वापर करुन तिच्या नावाने बनावट इन्स्ट्राग्राम अकाऊंट तयार केले होते. तसेच सदर तरुणीच्या फक्त चेहऱ्याचा वापर करुन मॉर्फ केलेले तरुणीचे अश्लिल फोटो व व्हिडीओ तसेच अश्लिल मजकुर इन्स्टाग्रामवर टाकण्यात आले होते. विशेष म्हणजे मॉर्फ केलेले सदर फोटो, व्हिडीओ व मेसेज सदर तरुणीच्या खऱ्या इन्स्ट्राग्राम अकाऊंटमधील १०६ मित्र मैत्रिणींना पाठविण्यात आले होते. हा प्रकार तरुणीच्या लक्षात आल्यानंतर सदर तरुणीने या प्रकाराची माहिती आपल्या आई-वडिलांना देऊन त्याबाबतची तक्रार कळंबोली पोलिसांकडे केली होती. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात आयटी ॲक्टसह बदनामीकारक माहिती प्रसिद्ध केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली होती. या गुह्याचा समांतर तपास करणाऱ्या नवी मुंबई सायबर सेलच्या पथकाने आधुनिक तंत्रज्ञान व तांत्रिक कौशल्याचा वापर तपास सुरु केला असता, अजय शिंगणे या आरोपीने सदर तरुणीचे बनावट इन्स्टाग्राम अकाऊंट तयार करुन त्यावर तिचे मॉर्फ केलेले फोटो व व्हिडीओ टाकल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार सायबर सेलने या आरोपीला अटक करुन त्याला पुढील कारवाईसाठी कळंबोली पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या घटनेतील तरुणीची बदनामी करण्याच्या उद्देशाने त्याने हा प्रकार केल्याचे व या प्रकरणात आणखी काही व्यक्तींचा सहभाग असल्याचे सायबर सेलचे पोलीस निरीक्षक विजय वाघमारे यांनी सांगितले.

या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात अग्निशस्राचा धाक दाखवून जबरी चोरी व चैन स्नॅचींग केल्याचे २ गुन्हे दाखल असल्याचे व या दोन्ही गुह्यात पोलिसांनी त्याला अटक केली होती.

## वैभव कदमने दिले १६७ सापांना जीवदान वर्षभरात सर्पमित्राचे योगदान

**दै.रायगड नगरी । गणेश प्रभाळे**

**दिघी** : दिघी - दिवसा व रात्रीच्यावेळी कोणत्याही क्षणाला मोबाईलची रिंग वाजली की येथील सर्पमित्र लागलीच पोहोचतो. क्षणाचाही विलंब न लावता भयभीत झालेल्या गावकर्यांच्या मदतीला येतो. बोर्लीपंचतन परिसरात कुठेही साप निघाला की, त्याला मारू न देता पकडणे व सुरक्षितरीत्या जंगलात सोडून देणे, या धाडसी सामाजिक कार्यामुळे वैभव कदम याचे कौतुक होत आहे.

नुसते साप असे जरी म्हटले तरी अनेकांची भंबेरी उडते. प्रत्यक्षात साप दिसला तर काय अवस्था होते, हे सांगायलाच नको; परंतु लोकांच्या मनातील सापांची भीती दूर करण्यासाठी वैभव गेल्या तीन वर्षापासून धडपडत आहे. सुरुवातीला बिनविषारी साप पकडण्यास सुरुवात करून, आता तो विषारी साप पकडण्याचे धाडस करत आहे. वैभवने आतापर्यंत नाग, मण्यार, अजगर, फोडसा, कांबळ्या अशा विषारी २२ जातीतील १६७ सापांना पकडून नैसर्गिक अधिवासात सोडले जाते.

कोकण पट्ट्यात मोठ्या प्रमाणात सापांचा अधिवास असून जास्त विषारी साप येथे सापडतात.

स्वतःचे अन्न शोधण्यासाठी बाहेर पडणारे साप भीतीपोटी व अंधश्रद्धेपायी माणसांकडून विनाकारण मारले जात असतात. खरेतर प्रत्येक जीव हा पर्यावरणाचा महत्त्वाचा घटक आहे. त्यांना मारून आपण कळत नकळत पर्यावरण संतुलनावरच घाला घालत आहोत. अलीकडच्या काळात सापांच्या संख्येत लक्षणीय घट झाली असून वैविध्यतेचे प्रमाणही कमी झाले आहे. निसर्गचक्र सुरळीत चालण्यासाठी साप वाचवणे गरजेचे आहे. यासाठी मी सापांचे रक्षण करण्याचे ठरवले आहे, असे वैभव सांगतो.

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन परिसरातील विविध गावांमधून त्याने दीडशेहून अधिक साप पकडले असून ते सर्पमित्र टीमच्या मदतीने जंगलात सुरक्षितस्थळी सोडले आहेत.

कुणीही सापांना मारू नये, जर आपल्या परिसरात साप आढळून आल्यास ७०६६५३३५९९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्याने केले आहे.



## गणपतीचे दर्शन करण्यासाठी गेलेल्या कुटुंबाच्या घरात साडे सहा लाखांची घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मित्रांच्या घरी गणपतीचे दर्शन करण्यासाठी गेलेल्या सीबीडी सेक्टर -४ मधील एका व्यावसायीकाचे घर अज्ञात चोरट्यांनी फोडून त्यांच्या घरातील तब्बल ६ लाख रुपयांची रोख रक्कम व ६० हजार रुपये किंमीतीचे दागिने चोरुन नेल्याची घटना उघडकिस आली आहे. सीबीडी पोलिसांनी या प्रकरणातील चोरट्याविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

सीबीडी सेक्टर -४ मधील सरगम अपार्टमेंटमध्ये रहाणारे डायाभाई मणवर यांचे सीबीडी सेक्टर -८ भागात कापड विक्रीचे दुकान आहे. डायाभाई हे कुटुंबासह वाशी व कोपरखैरणे येथील मित्रांच्या घरी गणपतीच्या दर्शनासाठी गेले होते. या कालावधीत त्यांचे घर बंद असल्याने चोरट्यांनी संधी साधुन त्यांच्या घराचे टाळे तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. त्यानंतर चोरट्यांनी डायाभाई यांनी कपाटात ठेवलेली ६ लाखांची रोख रक्कम व ६० हजार रुपये किंमतीचे दागिने असा तब्बल ६ लाख ६० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला. दरम्यान, गणपतीचे दर्शन घेऊन डायाभाई आपल्या घरी परतल्यानंतर घरात चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी सीबीडी पोलीस ठाण्यात याबाबतची तक्रार दाखल केली.

त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.


महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

धारिका क्रमांक : ११६५/५१२०/२५७४/दहा दिनांक :-१७ सप्टेंबर, २०२१

महाराष्ट्र शासनाच्या वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागा अंतर्गत येणाऱ्या खाली नमूद संवर्गाच्या एकूण २२८ पदांवरील भरती करीता विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | ६२/२०२१ | अधिष्ठाता (Dean), शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ | ६ |
| ४ | ६३/२०२१ ते ८३/२०२१ | विविध विषयातील प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट- अ | ९१ |
| ५ | ८४/२०२१ ते १०३/२०२१ | विविध विषयातील सहयोगी प्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ | १११ |
| ३ | १०४/२०२१ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, सामान्य राज्य सेवा, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय , गट-अ | २ |
| २ | १०५/२०२१ | प्रशासकीय अधिकारी, सामान्य राज्यसेवा, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, गट-ब | १८ |

**२.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरती प्रकियेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

**३.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. उपरोक्त जाहिरातींसाठी आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे (https://mpsconline.gov.in) दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी दुपारी १४:०० ते ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

ठिकाण : मुंबई

उप सचिव (सरळ सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग



**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.संजय कटेकर<br>कार्यकारी अभियंता (प्रकल्प),<br>बांधकाम विभाग,<br>पनवेल महानगरपालिका | १ आंबा,<br>१ फणस,<br>१ सोनचाफा | पनवेल महानगरपालिका हद्दीतील अमरधाम स्मशानभूमी ते गार्डन हॉटेल ते ठाणा नाका चौक ते कर्नाळा स्पोटर्सच्या समोर सिडको नाल्यापर्यंत पावसाळी गटाराचे बांधकाम करणे. सदर कामाचे कार्यादेश पमपा/श.अ./१७८४/२०२० दि.०५/११/२०२० रोजी मे.विकास कन्स्ट्रक्शन यांना दिले आहे. सदर सुशोभिकरण करण्याच्या कामामध्ये विविध प्रकारची ३ झाडे बाधित होत आहे. बाधित होणारी झाडे तोडण्याशिवाय गटाराचे काम करता येणे शक्य नाही. तरी १ सोनचाफा, १ आंबा व १ फणस अशी एकूण ३ झाडे तोडणेकामी परवानगी बाबत. |
| २ | आदित्य बिर्ला सायन्स ॲण्ड टेक्नोलोजी,<br>को.प्रा.लिमिटेड, प्लॉट नं.१ व १-A/ १ एमआयडीसी तळोजा, पनवेल-४१०२०८ | १ आंबा | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा एमआयडीसी येथे आमच्या सुरक्षा केबिन जवळ आमचे एक जुने आंब्याचे झाड आहे या पावसाळ्यात, ते झाड वाकले आहे आणि सुरक्षा केबिनवर कधीही पडू शकते आम्ही ते पुन्हा लावण्याच्या स्थितीत नसल्यामुळे ते कापून काढण्याची परवानगीची विनंती आहे. हे झाड सुरक्षिततेसाठी धोकादायक बनले आहे. तरी १ आंबा झाड तोडणेकामी परवानगी बाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
उपायुक्त I (मुख्यालय)
पनवेल महानगरपालिका

पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.६४/४०१/२०२१
दिनांक : १६/०९/२०२१